नवनिर्मित मृद व जलसंधारण या विभागास जागा वाटप करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्र.शाकाजा-१११८/प्र.क्र.१०९/२०१८/२२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: २५ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

मंत्रालय इमारतीच्या नुतनीकरणानंतर निर्माण झालेली जागा मा. मंत्री महोदय, मा. सचिव आणि मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना वाटप करण्यात आली आहे. अद्यापही काही मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जागे अभावी मंत्रालय इमारतीच्या बाहेर कार्यरत आहेत. तसेच, मृद व जलसंधारण या विभागाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे. सदर विभागास मंत्रालय इमारतीमध्ये कार्यालयीन जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. सबब, ७ व्या मजल्यावरील पुर्व बाजुकडील मुख्य इमारत व विस्तार इमारत यांना जोडणारा पुल येथील संपूर्ण २३४६ चौ.फूट क्षेत्रफळाची जागा नवनिर्मित मृद व जलसंधारण विभागास वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय :-

७ व्या मजल्यावरील पुर्व बाजुकडील मुख्य इमारत व विस्तार इमारत यांना जोडणारा पुल येथील संपूर्ण २३४६ चौ.फूट क्षेत्रफळाची जागा नवनिर्मित मृद व जलसंधारण विभागास वाटप करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांनी उपरोक्त जागेचा ताबा संबंधितांना द्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५११२८०४५९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradnya Prakash Sawant

Digitally signed by Pradnya Prakash Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dcab5c13648ccfdd9424ee4584da4e72f3f6f06dfd6b1eaa220fc9de68f36473, cn=Pradnya Prakash Sawant
Date: 2019.03.25 11:38:51 +05'30'

(प्र. प्र. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य
२. मा.सभापतींचे सचिव/मा.अध्यक्षांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिवांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सह सचिव (का.२२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. उप/सह सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१२. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.
१३. उप अभियंता, दक्षिण उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एम.टी.डी.सी.समोर, मुंबई.
१४. शाखा अभियंता, मंत्रालय शाखा (स्थापत्य), सा.बां. मंत्रालय आवार, मंत्रालय, मुंबई-४०००३२
१५. निवडनस्ती.